INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

April-May-June- 2017

Vol. 4, Issue 2

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges Publications

UGC Approved List of Journals

You searched for **research journey**

|| Home ||

**Total Journals : 2**

Show 25 entries Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View | 1 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yevla | | 23487143 |
| View | 2 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries

Previous 1 Next

**This Journal is indexed in :**

- Dictionary of Research Journal Index (DRJI)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

# Editorial Board


## Chief Editor -

**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

## Co-Editors -

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom** of **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur [M.S.] India
- **Dr. G. S. Wankhede** - Baliram Patil Arts, Commerce & Science College, Kinwat-Nanded
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prin. Dr. B. V. Game** - MGV's Arts and Commerce College, Yeola-Nashik [M.S.] India
- **Dr. Sharad Birhade** - D. N. College, Faizpur.
- **Prof. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.
- **Prof. V. S. Bhalerao** - J. N. V. Kangda, [H.P.] India.

## Advisory Board -

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib. Science, Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

## Review Committee -

- **Dr. Leena Pandhare** - HoD. of English, MGV's Arts and Commerce College, Yeola-Nashik [M.S.] India
- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. K. Wadekar** – M. S. G.College, Malegaon Camp, Dist- Nashik



## Publisher:

- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, (Yeola) Nashik**

**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# इंटरनेटवरील महानुभाव पंथीय साहित्य : स्वरुप आणि वेगळेपण

**डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर**
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड ता. नांदगाव जि. नाशिक
मो. ९९२२७१३८२५

महाराष्ट्रात यादव कालखंडात श्रीचक्रधर स्वामी यांनी भ्रमंती करुन सर्वसामान्य जनांना परमेश्वर भक्तीचे महत्त्व पटवून दिले. श्रीचक्रधरांनी आपले विचार व्यक्त करण्यासाठी सर्वसामान्य जनांच्या बोलीभाषेचा जाणीवपूर्वक वापर केला. त्यांनी आपले विचार सूत्रबद्ध पद्धतीने व्यक्त केले. सर्वसामान्यांना ते समजावेत म्हणून काही कथा व दृष्टांतही सांगितले. श्रीचक्रधरांच्या विचारांनी प्रभावित होऊन सर्वसामान्यांबरोबर अनेक संस्कृत पंडितांनी त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. श्रीचक्रधरांना ते पूर्णपरब्रह्म परमेश्वराचा अवतार मानत. त्यांचा श्रीचक्रधरांवर अपार श्रद्धाभाव होता. शके ११९६ मध्ये श्रीचक्रधरांनी उत्तरापथे गमन केल्यानंतर महानुभाव पंथाचे आद्यआचार्य श्री नागदेवाचार्य यांच्या नेतृत्वाखाली हा शिष्य परिवार एकत्र आला. पुढील काळात अनेक नवीन शिष्य नागदेवाचार्यांना लाभले. या परिवारातील काही संस्कृत पंडितांनी श्रीचक्रधरांची आज्ञा पाळून नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली मराठीतून साहित्य निर्मिती केली. या साहित्यिकांमध्ये म्हाइंभट, केशिराज व्यास, दामोदर पंडित, भास्करभट्ट बोरीकर, परसराम बास, नरेंद्र, बाईदेव व्यास इत्यादी काही प्रमुख साहित्यिक होते.

श्रीचक्रधरांच्या कालखंडात मराठी भाषा यादवकालीन रुपाच्या टप्प्यावर येऊन पोहचली होती. मात्र एखादा अपवाद वगळल्यास तिच्यातून ग्रंथ निर्मितीला प्रारंभ झाला नव्हता याचे प्रमुख कारण होते, संस्कृतचा धर्म-मार्तंडांवर असलेला पगडा. धर्माचे तत्त्वज्ञान, धार्मिक ग्रंथ फक्त संस्कृतमधूनच लिहिण्याची परंपरा काटेकोरपणे पाळली जात होती. मात्र श्रीचक्रधरांनी क्रांतीकारी निर्णय घेऊन धर्माचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांच्या बोलीभाषेत म्हणजे मराठीत सांगितले आणि सर्वसामान्यांना धर्म जाणण्याच्या अधिकार प्राप्त करुन दिला. आजच्या टेक्नॉलॉजीच्या युगात असाच क्रांतीकारी निर्णय काही महानुभाव पंथीयांनी घेऊन श्रीचक्रधरांच्या प्रेरणा व भक्तीतून निर्माण झालेल्या व होत असलेल्या साहित्याला इंटरनेटद्वारे धर्म-जात-प्रांत-भाषा-लिंग-वय इत्यादी मर्यादांच्या पलीकडे असलेल्या सर्वसामान्य जनांना उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न सुरु केलेले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून पुढील काही प्रमुख वेबसाईटस् इंटरनेटवर सुरु झालेल्या आहेत.

१) www.sarvadhnya.com – या वेबसाईटवर खालीलप्रमाणे साहित्य उपलब्ध आहे.

**अ) Mahanubhav Books-**

१) दैनिक पुजाविधी २) इशस्तूती भजनावली ३) महानुभावांचे पोवाडे ४) समासचक्र, ५) पंचस्तोत्र समुच्चय ६) महात्मा किंवा महानुभाव पंथ ७) महाराष्ट्रभाषा सरस्वतीच्या महालातील एक अज्ञात दालन ८) महानुभावीय मराठी वाङ्मय ९) महानुभावीय छंद वाङ्मय १०) इम्पिरियल गॅझेटियर महानुभाव पंथ संबंधी आलेल्या सरकारी इंग्रजी मजकुराचे मराठी भाषांतर सन १९०९ (२ लेखांचा संग्रह) ११) ध्यानामृत स्तोत्र १२) बालकृष्ण भजनमाला भाग-२ १३) अभंग शतकावलि १४) श्रीमद्भागवत गीता १५) वरद रुक्मिनी सैंवर १६) रुजाहरण स्तोत्र १७) निर्वेद स्तोत्र, १८) चरित्र अबाब १९) महानुभाविय श्लोक, अभिजीते, स्फूट रचना, पंगतीचे श्लोक, माहितीपर श्लोक इत्यादी रचना, २०) साधनामृत स्तोत्र २१) मंगलाष्टके (महानुभाव पंथात वापरली जाणारी तीन प्रकारची मंगलाष्टके) २२) महानुभाव पंथ प्राचीन परंपरा व नाशिक जिल्हा व महानुभाव पंथ २३) पुजापाठ २४) पंथ परिचय २५) वैचारिक चिंतन २६) श्री गोविंदप्रभु दर्शन २७) श्रीचक्रधर स्वामींच्या अध्यात्मिक

व सामाजिक क्रांतीचे स्वरुप २८) महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचा मुळ श्रोत २९) पर सिद्धांत ३०) महानुभाव वाङ्मयातील पंचकृष्ण ३१) महानुभाव सांप्रदायाचे अवैदिकत्व ३२) महानुभाव सांप्रदायाचा दृष्टीकोन ३३) जीवनाचे ध्येय ३४) ध्येयात्मक दृष्टीक्षेप ३५) ध्येयवेडे प्रेमपिसे ३६) चक्रधर लीळाचरित्र संशोधन आणि संशोधक ३७) भारतीय दर्शने आणि महानुभाव तत्त्वज्ञान, ३८) अन्यथावाद, ३९) महानुभाव दर्शनातील सृष्टिसिद्धांत आणि अंतिमसत्य

**ब) Mahanubhav pothi’s**

१) वच्छला सैंवर २) टीका लापीका सहित लक्षण वचन संबंध ३) गीता प्रश्नावळी व गीता सरोळे लापीका ४) चेंडुफळी व आत्मज्ञान स्तोत्र ५) श्रीगोविंदप्रभु चरित्र (शोधकाराचे) ६) मतप्रबंध काव्य ७) बासविरह (अर्थात ‘भटोबास विरह’ अथवा ‘भानखेड ओव्या’) ८) मतीरत्नाकर काव्य ९) संकेतमाळा स्थळ अर्थात विद्या विळास स्थळ १०) स्मरणसार, पूर्विचा अर्थ व पक्षभेद परिक्षा ११) साध्य मंजीरि व प्रकरण सरवळे १२) प्रश्नसार परीहार १३) काव्यमय गीता टिका १४) आचार विचार माळीका भाष्य १५) दृष्टांत स्तोत्र, १६) निर्वच धडे १७) सिद्धांतामृत स्तोत्र १८) ‘नामपट’ सुंदर लिपी, १९) ‘नामपट’ सकळ लिपी २०) ‘नामपट’ देवनागरी/मराठी २१) लीळाचरित्र सरोळा/अबाब २२) प्रसाद वस्तू परिचय २३) श्रीमार्ग प्रभाकर २४) लीळाचरित्राची पुर्वपिठीका २५) श्री दत्तात्रेय प्रभु लीळाचरित्र २६) श्री दत्तात्रेय प्रभुंच्या आत्मतीर्थलीळा, २७) आत्मतीर्थ प्रतिष्ठा प्रमेय.

लीळाचरित्रातील लीळा, स्मृतिस्थळ या मुख्य ग्रंथांबरोबरच देवनागरी लिपीतील लेखन सकळ/सुंदर लिपीत बदलण्याची व्यवस्थाही या साईटवर आहे, त्यासाठी मात्र मूळ फाईल Kruti font अथवा ISM font मध्ये upload करावी लागते. या साईटवर गॅलरी असून त्यावर खारसशी (मंदिर, देवस्थाने), songs, Arti/Bhajan, stotra, सराश या बाबी आहेत.

२) http://shreekrushna.wixsite.com/mahanubhavpanth/books

ग्रंथ, महानुभाव पंथाविषयी, फोटो गॅलरी, आरती संग्रह, महानुभाव पंथ विषयीच्या बातम्या, कार्यक्रम, दिनविशेष इत्यादी सदरे या website वर आहेत.

३) https://sites.google.com/site/shrisarwadnya/literature/books

**अ) English Books-**

E-01] mahanubhav- panth-Jaikrishni-panth-Dr. sanatanmuni-shashpurkar
E-02] The-Divine-story-of-shri-chakradhar swami-Dr. Sanatanmuni
E-03] Shrimad bhagavad Gita-Devdutt muni mahanubhav
E-04] mahanubhav-sampradaya-sarvadnya-vidyapeeth-malvadgaon

**इ) Hindi Books-**

Bhajan, Artiya, Both Kathayen, Stotra Chalisa puja avsar

**उ) Marathi Books:-**

1) Abhang Shatak 2) Antim satya 3) Anyathawad 4) Balkrishna Bhajanmala 5) Bhartiya darshane ani mahanubhav tatwadnyan 6) Chakradhar Lilacharitra sanshodhan ani sanshodhak 7) Charitra Abab 8) Dainik Poojavidhi 9) Dheye wede prem pise 10) Dheyatmak drushtikshep 11) Dnyanamrut stotra याबरोबरच Audio, Images, videos, About mahanubhav panth इत्यादी सदरे या साईटवर आहेत.

४) www.shrichakradhar.com

१) mahanubhav calender 2017
२) Sthan darshan - स्थानांची छायाचित्रे
३) Digital Library-

१) मोक्ष मार्ग का अनुगमन २) ब्रह्मविद्या शास्त्र ३) श्रीक्षेत्र रिद्धपूर (काशी) तिर्थस्थान मार्गदर्शिका ४) स्थानदर्शन ५) स्मरण विधी देवपूजा प्रसाद वंदन, ६) ऋद्धिपूर वर्णन, ७) वत्साहरण ८) ज्ञानप्रबोध ९) उद्धव गीता १०) विचार-विचार मालिका ११) दृष्टान्तपाठ १२) सार्थ सूत्रपाठ १३) सरल ब्रह्मविद्याशास्त्र १४) श्री चक्रधर चरित्र १५) ब्रह्म विद्या शास्त्र का विवेचन १६) मूर्तिज्ञान १७) तीनों-पूजावसर १८) आचार-आचारमालिका १९) स्मृतिस्थल २०) श्री गोविंदप्रभु चरित्र २१) श्री दत्तात्रेय चरित्र तथा श्री चक्रपाणि चरित्र

वरील ग्रंथ संपदा महानुभाव आश्रम श्रीरामपूर तथा श्रीकृष्ण मंदिर थापरनगर, मेरठ येथील दत्तराज बालमुकुंद शास्त्री यांनी तसेच कृष्णराज पंजाबी, प्रेममुनि पंजाबी आदिंनी हिंदीत उपलब्ध करुन दिलेली आहे. शिवाय डिजीटल लायब्ररीमध्ये Begineer's level, Intermediate level, Advance Level, Intensive studies या पातळ्यांवर साहित्य उपलब्ध आहे. त्याचबरोबर श्रीमद भागवत गीता, लीळाचरित्र हे ग्रंथ स्वतंत्रपणे देण्यात आलेले आहे. त्याशिवाय भजन आणि निरुपणाच्या श्राव्य मुद्रिका (Audio clips) आणि काही video clips या वेबसाईटवर देण्यात आलेल्या आहेत.

या प्रमुख वेबसाईटबरोबरच अनेक वेबसाईटस् इंटरनेटवर सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी काही साईटस् खालीलप्रमाणे आहेत.

1) www.shriprabhu.com
2) www.shrigovindprabhu.com
3) www.shrichakradharswami.com
4) www.shrikrushna.com
5) www.shrichakrapanimaharaj.com
6) www.shridattatrayprabhu.com

या साईटस्वर स्तवन,आरती, स्थान-सूची-नकाशा व स्थानानुसार लीळा क्रमांकाचा उल्लेख उपलब्ध करुन देण्यात आला आहे. 'महानुभाव संदेश' या नियतकालिकाची www.mahanubhavsandesh.com ही वेबसाईट सुरु करण्यात आलेली आहे. Blogspot `m website वरही खालीलप्रमाणे महानुभाव पंथ विषयक माहिती उपलब्ध आहे.

1)https://bhagvans.blogspot.com/2011/12mahanubhav-panth-ingormation-english.htm
2) www.mahanubhavdarshan.blogspot.com/..../picture-gallery
3) www.panchkrishna.blogspot.com/p/download-mahanubhav-panth

महानुभाव पंथ विषयक काही **Android Apps** ही निर्माण करण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

1) Sarvadnya.com
2) Mahanubhav Darshan
3) Mahanubhav panth.

**https://www.youtube.com** वर आरत्या, स्थानदर्शन यांच्या दृक-श्राव्य चित्रफिती upload करण्यात आलेल्या आहेत. फेसबुकवरही काही युजर्सने महानुभाव पंथासंदर्भात माहिती टाकलेली आहे. उदा. https://www.facebook.com/mahanubhav.panth त्याचबरोबर whatsApp सारख्या सामाजिक प्रसारमाध्यम असलेल्या ॲप्लीकेशनवर सुद्धा विविध ग्रुप निर्माण करुन पंथीय साहित्याची, इमेजेसची देवाणघेवाण केली जाते. http://en.wikipedia.org/wiki/mahanubhava या साईटवरही पंचावतार, पंथाचे तत्त्वज्ञान, आचार, साहित्य या विषयीची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. www.bookganga.com या साईटवर शं. गो. तुळपुळे यांच्या 'महानुभाव पंथ आणि त्याचे वाङमय' या ग्रंथाची माहिती व प्रस्तावना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याचबरोबर इतरही विविध साईटस्वरही महानुभाव पंथ व त्याच्या साहित्याची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**इंटरनेटवरील महानुभाव पंथीय साहित्याचे वेगळेपण :-**

१) इंटरनेटवरील या साहित्यात सांप्रदायीक ग्रंथ, पोथ्या यांचे प्रमाण अधिक आहे.

२) या साहित्यात स्तोत्र, स्तवन, श्लोक, आरत्या यांचे प्रमाण मोठे आहे.

३) हे साहित्य विष स्वरुपात उपलब्ध आहे.

४) या साहित्यात संशोधनात्मक साहित्य तुलनेने नगण्य आहे.

५) पंथाचा व पंथीय साहित्याचा परिचय करुन देणारे साहित्यही त्यात आहे.

६) दैनिक पूजाविधी, भजनावली, अभंग, पोवाडे, सांप्रदायिक मंगलाष्टके, बोधपर साहित्य, स्फूट रचना इत्यादी रचनाही इंटरनेटवरील या साहित्यात आहेत.

७) महानुभावीय छंद वाङ्मय, इम्पिरियल गॅझेटियर महानुभाव पंथ संबंधी आलेल्या सरकारी इंग्रजी मजकुराचे मराठी भाषांतर, वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

८) हिंदू धर्माप्रमाणेच महानुभाव पंथ श्रीमद्‌भगवत गीतेला प्रमाण ग्रंथ मानतो त्यामुळे हा ग्रंथ त्याच्या मराठी भाषांतरासह उपलब्ध करुन दिलेला आहे.

९) पंथीय पोथ्या स्कॅनिंग करुन pdf फॉरमॅटमध्ये स्वतंत्र सदरात उपलब्ध करुन दिलेल्या दिसतात.

१०) देवनागरी लिपीतील मजकुराची सकळ/सुंदर लिपीत बदलण्याची सोयही काही वेबसाईटस्‌वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

११) लीळाचरित्र, गोविंद प्रभू चरित्र, स्मृतिस्थळ, दृष्टांत स्तोत्र हे महत्त्वाचे महानुभावीय ग्रंथ काही वेबसाईटस्‌च्या होमपेजेसवरच उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

१२) महानुभाव पंथीय तत्त्वज्ञानावर लिहिलेले काही ग्रंथही या वेबसाईटवर आहेत. ते सांप्रदायिक स्वरुपाचे आहेत.

१३) काही वेबसाईटवर ‘धार्मिक गेम’ ही उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

१४) मराठी भाषेतील ग्रंथांबरोबरच इंग्रजी व हिंदी भाषेतील महानुभावीय ग्रंथ काही वेबसाईटवर आहेत.

१५) डिजीटल ग्रंथांबरोबरच फोटो गॅलरी (मंदिरांचे, स्थानांचे, पंचकृष्णांचे फोटो), पंचकृष्ण चरणांकित स्थानांचे लीळा क्रमांकासह नकाशे, महानुभाव पंथाविषयीच्या बातम्या, कार्यक्रम, दिनविशेष, दिनदर्शिका इत्यादी गोष्टी या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

१६) या वेबसाईटस्‌चे स्वरुप सांप्रदायीक आहे.

१७) पंथीय नियतकालिकांच्याही काही स्वतंत्र वेबसाईटस् आहेत.

१८) काही वेबसाईटस्‌ने आपले Android Application सुद्धा उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्या माध्यमातून साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे. अशा काही वैशिष्ट्यांसह महानुभाव साहित्य आज इंटरनेटवर उपलब्ध झालेले आहे.

महानुभाव पंथीय मतानुसार सुमारे ६५०० ग्रंथ महानुभाव पंथीयांनी लिहिलेले आहेत. त्यापैकी अनेक ग्रंथ अजूनही अप्रकाशित आहेत. १९ व्या शतकाच्या अखेरपासून पंथीयेतर अभ्यासकांना महानुभाव साहित्य अभ्यासासाठी उपलब्ध करुन देण्यात आले. ह. ना. नेने, वि. भि. कोलते, शं. गो. तुळपुळे, ब्रह्मानंद देशपांडे, यु. म. पठाण, सुरेश डोळके, पुरुषोत्तम नागपुरे, म बाळकृष्ण शास्त्री, म. मुरलीधरशास्त्री आराध्य इत्यादी अनेक अभ्यासकांनी संशोधन तसेच संशोधनास सहाय्य करुन महानुभाव साहित्याचे दालन अभ्यासकांसाठी उपलब्ध करुन दिले. त्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. जेथे पोथ्यांचा संग्रह असेल अशा आश्रम–मठांमध्ये काही दिवस राहून त्यांनी त्या पोथ्यांचा अभ्यास केला. अनेक प्रतींवरुन एखाद्या ग्रंथाच्या अभ्यासपूर्ण संशोधनाची जबाबदारी स्वीकारुन अनेक अडचणींना तोंड देवून मुद्रित स्वरुपात ग्रंथ संपादित केले आणि म्हणूनच आज सर्वसामान्य जणांना पुन्हा एकदा महानुभाव साहित्य उपलब्ध झालेले आहे. इंटरनेटने तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हे कार्य अधिक

वेगात होऊ शकते. त्याचा पूर्वार्ध वर्तमानकाळात सुरु झालेला दिसतो. महानुभावांच्या प्रत्येक ग्रंथ–पोथी संग्रहाने आपली स्वतंत्र वेबसाईट निर्माण करुन किंवा शासन स्तरावरुन महानुभाव साहित्यासाठी एक वेबसाईट निर्माण करुन त्यात विविध पोर्टलच्या सहाय्याने सर्वच महानुभाव पंथीय ग्रंथ–पोथी संग्रहांचे डिजीटलायझेशन करुन त्या वेबसाईटवर उपलब्ध करुन दिल्यास अभ्यासकांना या ग्रंथ–पोथ्यांच्या शोधासाठी होणारा त्रास कमी होऊन त्यांचा वेळ आणि श्रमही वाचतील. तितका अधिक वेळ ते आपल्या संशोधनाला देतील. त्यांनी संशोधित केलेले साहित्यही वेबसाईटवर उपलब्ध झाल्यास पुढील अभ्यासकांना ते संदर्भासह उपलब्ध होईल. त्यामुळे समृद्ध अशा मराठी महानुभाव पंथीय साहित्याबद्दल गैरसमज दूर होऊन मराठी सारस्वताचे एक समृद्ध दालन अधिक प्रकाशमान होईल.

**संदर्भ** :- www.google.com